"शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूरक व्यवसायाची भूमिका : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा" (सन २००८-०९ ते २०१८-१९)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्यविद्या शाखेअंतर्गत अर्थशास्त्र या विषयामध्ये पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर केलेला पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

राम भोजू कदम

एम.ए, (अर्थशास्त्र), बी.एड्.

मु.पो.मरळक (बु.) ता.जि.नांदेड.

मार्गदर्शक

डॉ. पी. आर. मुट्ठे

सहयोगी प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख आणि संशोधन केंद्र, यशवंत महाविद्यालय, नांदेड

ऑगस्ट-२०२१

"शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूरक व्यवयासाची भूमिका : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा"

गोषवारा :

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारतात एकूण लोकसंख्येच्या ५० टक्क्यांच्या वर लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. महाराष्ट्रातील मराठवाड्याचा विचार केला असता. तो कोरडवाहू क्षेत्रामध्ये येतो. हिंगोली जिल्ह्याचा विचार करता हा जिल्हा डोंगराळ हा जिल्हा डोंगराळ जिल्हा म्हणून ओळखला जातो. व तेथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. परंतू तेथील शेतकऱ्यांना शेती करताना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. त्यात पावसाचा लहरीपणा, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, शेतीसाठी सावकारी व बँकेकडून घेतलेले कर्ज, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीचा वाढणारा खर्च अशा संकटांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. शेतकऱ्यांना शेतीवर कुटूंब, मुलांचे शिक्षण, आजारपण, घरखर्च, विवाह, धार्मिक कार्य, सण-उत्सव अशा कार्यासाठी पैसा लागतो. शेतीच्या उत्पन्नातुन ह्या गरजा पूर्ण होत नसल्याने शेतकरी शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसायाकडे वळला असुन शेती पूरक व्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत कसा बदल होत आहे हे पाहण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील ५ शेतीपूरक व्यवसाय निवडलेत. त्यात

१. शेळी व मेंढीपालन.

२. दुग्ध व्यवसाय.

३. कुक्कुटपालन.

४. फुलशेती.

५. फळशेती.

ह्या शेतीपूरक व्यवसायांचा अभ्यास ह्या संशोधनात करण्यात येणार आहे. त्यासाठी काही उद्दिष्ट्ये निवडली आहेत. १. शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीत शेतीपूरक

व्यवसायांचे महत्त्व अभ्यासणे., २. हिंगोली जिल्ह्यातील शेतीपूरक व्यवसायांचा आढावा घेणे.,३. शेतीपूरक व्यवसायातील समस्यांचा अभ्यास करणे. ४. कृषीपूरक व्यवसाय वृद्धीसाठी शासकीय योजनांचे योगदान अभ्यासणे., ५. शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक विकासातील शेतीपूरक व्यवसायांची भूमिका विचारात घेणे.

गृहीतकृत्ये हे संशोधनाचे संभाव्य उत्तर असते त्यामुळे त्या संशोधनासाठी गृहीतकृत्याची मांडणी केली आहे. १. हिंगोली जिल्ह्यात शेतीपूरक व्यवसायांची प्रमाण कमी आहे., २. हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती खालावलेली आहे., ३.शेतीपूरक व्यवसाय करतांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.,४. गरजू शेतकऱ्यांपर्यंत शेतीपूरक व्यवसायांचे लाभ पोहोचविण्यात सरकारला अपयश आले आहे., ५. शेतीपूरक व्यवसायामुळे हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीत सुधारणा शक्य होते.

"शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूरक व्यवयासाची भूमिका : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा" हा विषय अभ्यासण्यासाठी प्राथमिक व दुय्यम संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

प्रस्तावना :

मानव आपल्या गरजांच्या पुर्ततेसाठी निरनिराळे व्यवसाय करतो त्यापैकी कृषी व्यवसायाला अनन्य साधारण असे महत्व आहे. कृषी हा मानवाचा प्राचिन व प्राथमिक व्यवसाय आहे. भारतात शेतीचा विचार केला असता ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या दृष्टीने कृषी क्षेत्राची भुमिका महत्वपुर्ण असल्यामुळे कृषी क्षेत्राच्या विकासावर भारतातील ग्रामीण क्षेत्राचा विकास अवलंबुन आहे.

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. अर्थव्यवस्थेत कृषीला अतिशय महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. भारतातील शेती व्यवसाय हा अर्थव्यवस्थेचा कणाच होय. देशातील ५० टक्केच्या वर लोकसंख्या प्रत्यक्ष व

अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबुन आहे. भारतीय शेतीला एक ऐतीहासीक, सांस्कृतीक, आर्थिक महत्व प्राप्त झाले आहे.

कृषी क्षेत्राचा उगम व विकास :

कृष : हा शब्द 'कृषि' म्हणजे 'नांगरणे' या धातूपासून झाला आहे. परंतू 'कृषी' या संज्ञेचा अर्थ केवळ जमिन नांगरुन त्यातील पीक काढणे एवढ्यापूरताच मर्यादित नाही. कृषी व्यवसायाचा व्यापक अर्थ बराच विस्तृत आहे. मानवाच्या विकासाबरोबरच शेती या व्यसायाची सुरुवात झाली जसे-जसे मानवाचा विकास होत गेला तसतसे अनेक गोष्टी तो आत्मसात करीत गोल. त्याचाच एक मानवाला शेती व्यवसायाचा लागलेला शोध होय. सुमारे अकरा हजार वर्षापूवी अदिमानवाच्या हे लक्षात आले की झाडावरुन पडणारे बियाणे जमिनीवर खाली पडल्यावर वातावरणामुळे जमिनीत रुजते व उगवते आणि त्यातूनच वनस्पतीची वाढ होते. तेंव्हापासून मानावाने शेती करण्यात सुरुवात केली.

भारतातील शेतीचा इतिहास :

नव-अश्मयुगाचा काल इ.स.पू. १०,००० वर्षाचा गणला जातो. तत्पूर्वी मानव रानटी अवस्थेत होता. येथील लोकांनी सर्वप्रथम गहु व बार्ली या पिकांचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली. यानंतरच्या ताम्रपाषण युगाच्या काळात (इ.स.पू.५००० ते ३०००) मध्ये लोक शेती करुन घरे बांधून स्थायिक झाले. या काळात शेती बरीच प्रगत झाली होती. इतिहासाला माहित असलेली पहिली शेती ख्रिस्तपुर्व ५००० वर्षापुर्वीची इजिप्त आणि बॅबीलॉन येथील शेती होय. मोहेंजोंदडो अणि हडप्पा येथील उत्खननांवरुन सिंधू संस्कृती इ.स.पू. (३२००-२७००) ही नागरी संस्कृती होती हे स्पष्ट होते की त्या संस्कृतीतील लोकांचा व्यवसवाय मुख्यतः शेती होता. त्याचप्रमाणे वैदिक काळ, बौध्द काळ, मौर्यकाळ, मोघल काळ, ब्रिटीशकाळात सुध्दा मुख्य व्यवसाय शेती हा होता.

भारत देशाचे भौगोलिक क्षेत्रफळ ३२,८७,२६२ चौ.कि.मी. असून क्षेतफळाच्या दृष्टीने भारताचा जगात सातवा क्रमांक आहे. लागवडी योग्य क्षेत्राचे प्रमाण ७७ टक्के आहे. व

वनक्षेत्राचे प्रमाण २२.९२ टक्के आहे व प्रत्यक्ष लागवडी खालील क्षेत्र सन १९५०-५१ मध्ये ४६.३९ टक्के आहे तर सन २००९-१० मध्ये हे प्रमाण ६२.८९ टक्क्यापर्यात वाढले आहे. या जमिनीतून विविध पिके घेतली जातात.

भारतीय शेतीची व्याप्ती :

शेती व्यवसायाचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्व विचारात घेतले असता रोजगार निर्मितीचे महत्वाचे क्षेत्र म्हणूनही या क्षेत्राकडे पाहिले जाते. सन १९५०-५१ मध्ये देशाच्या एकूण काम करणाऱ्या लोकसंख्या पैकी ६९.५ टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबुन होती. सन २००१ मध्ये ५६.६ टक्के व सन २०११ मध्ये ५१.०० टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून होती. एकंदरित ५० टक्क्याच्या वर रोजगार पूरवून देणारा व्यवसाय म्हणून या भातरत कृषी व्यवसायाकडे पाहिले जाते. भारतात विकसित देशाची शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येची तूलना केली असता अमेरिकेत एकूण लोकसंख्येच्या २ टक्के व इंग्लंड ३ टक्के इतकीच लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. जे भारताच्या तूलनेत खूपच कमी आहे.

राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा हिस्सा विचारात घेतला असता सन १९५०-५१ मध्ये शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील एकूण हिस्सा ५६.४ टक्के होता. तो सातत्याने कमी होवून २०१६-१७ मध्ये १३.२ टक्केच झाला. विकसित देशाचा विचार केला असता. अमेरिकेचा राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा हिस्सा ३ टक्के व इंग्लंड २ टक्के इतका दिसून येतो. यावरुन भारत आजूनही विकसनशील देश असल्यामुळे शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा अधिक असल्याचे दिसून येते.

भारतात शेत जमिनीचा वापर शेती उत्पादनासाठी होत असला तरी भारतात शेतीच्या उत्पादकतेचा जास्त विचार केला असता भारतात पहिली हरितक्रांती गहू व तांदूळ या पिकात होवूनही उत्पादन भारतात या पिकांची उत्पादकता इतर देशाच्या तुलनेत जसे अमेरिका,चीन, इजिप्त, फ्रान्स अशा इतर देशांच्या तुलनेत कमी आहे. अल्प उत्पादकतेची अनेक कारणे

आहेत जसे नैसर्गिक घटक, संस्थात्मक घटक, तांत्रिक घटक, सामान्य घटक, सामाजिक वातावरण, लोकसंख्येचा शेतीलवरील अतिरिक्त ताण, जमिनीची धूप, शेतकऱ्यांचे अज्ञान व निरक्षता, शेतीचा व्यावसायीक दृष्टिकोणाचा अभाव, भांडवलाचा अभाव शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष अशा विविध कारणांमुळे भारताची कृषी उत्पादकता कमी आहे.

महाराष्ट्रातील भौगोलिक स्थिती :

महाराष्ट्रातील पिक परिस्थितीचा आढावा घेतला असता महाराष्ट्र राज्य उष्ण कटिबंधात मोडते. त्यामुळे राज्यातील हवामान बहूतांशी समशीतोष्ण कोरडे आहे. राज्यात सर्वसाधारणपणे वार्षिक पावसाचे प्रमाण ५००ते ६०० मि.मी. पर्यंत आहे. मुख्यतः पाऊस नैऋत्य मान्सून वाऱ्यापासून ६० ते ७० दिवसात पडतो. महाराष्ट्रातील पूर्व भागात ईशान्य मान्सून वाऱ्यापासून सप्टेंबर-ऑक्टोंबर महिन्यात पाऊस पडतो. उन्हाळ्यात तापमान जास्तीतजास्त ४५ अंशापर्यंत वाढते. ते हिवाळ्यात ५ अंश से पर्यंत कमी येते. महाराष्ट्रातील पश्चिम किनापरट्टीवर हवामान उष्ण व दमट असते. हवेतील आर्द्रतेचे प्रमाण ५०-९० टक्क्यापर्यंत असते. महाराष्ट्रातील पडणारा पाऊस, जमिनी, पीक पध्दती, व वनस्पती आणि उष्ण तापमान या सर्वांचा विचार करुन ९ कृषी हवामान विभाग पाडण्यात आले. महाराष्ट्रातील शेती ही ६५ टक्के ते ८४ टक्के पावसावर अवलंबून आहे. पावसाचे प्रमाण हे अनियमित व कमी कालावधीत जास्त पाऊस किंवा दोन पावसात मोठा खंड पडत असल्यामुळे पिकांची उत्पादकता अतिशय कमी असून त्यात नेहमीच अस्थितरता आढळून येते.

मराठवाडा विभागातील बहूतांश शेतीचा भाग ही कोरडवाहू क्षेत्रात येत असुन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात पिक पध्दती पारंपारीक असुन आहे. त्यात मुख्यतः खरीप व रब्बी पिके घेतली जातात. हे खरीप पिक हे पावसाच्या पाण्यावरच असल्यामुळे तीची शाश्वत नसून शेतकरी संकटात येतात. कारण कोरडवाहू पिकाचे उत्पादन अतिशय कमी प्रमाणात मिळते. मराठवाड्यातील लोकसंख्या ८०-८५ टक्के लोक शेतीक्षेत्रावर अवलंबून आहेत. वाढत्या लोकसंख्यामुळे लागवडी खालील असलेले क्षेत्र घटत आहे व दरडोई उत्पन्न कमी होत आहे.

कोरडवाहू शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान जास्त काळ न टिकणारे असल्यामुहे शेतीची उत्पादकता कमी आहे. त्यामुळे जास्त शेतकरी कृषी बरोबरच शेतीपूरक व्यवसायाकडे वळलेले दिसून येत आहेत .

१ मे १९९१ साली परभणी जिल्ह्यातून हिंगोली हा जिल्हा स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तीत्वा आला. शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूकर व्यवसायाचे भूमिका : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा." हा विषय निवडला असून हिंगोली जिल्हा हा १९.०५ उत्तर ते २०.०५ उत्तर या अक्षांकशावर आर्द्रता ७६.३० पूर्व ते ७७.३० पूर्व या रेखांषाच्या दरम्यान पसरलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा आणि वाशिम पुर्वेस यतवमाळ आणि नांदेड, दक्षिणेस नांदेड आणि परभणी तर पश्चिमेस परभणी आणि जालना जिल्ह्याच्या सीमा आहेत. ह्या जिल्ह्याचे ४,८२६ चौ.कि.मी असून महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्यातूलनेत १.५७ टक्के आहे. हिंगोली जिल्ह्यात एकूण पाच तालूके व एकुण लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ११,६६,३४५ असून ह्या जिल्ह्याचे हवामान पावसाळ्या व्यतिरिक्त सर्वसाधारण कोरडे असते. हिंगोली जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ८२४.४० मि.मी. असून सन २०१६ यावर्षी ६५१.५० मि.मी. इतका पाऊस झाला हा प्रदेश उष्ण कटिबंधातील असल्यामुळे उन्हाळा कडक असतो. हिंगोली जिल्ह्याचा बहूतांश भाग गोदावरी नदीच्या खोऱ्यात येतो. जिल्ह्यातून पैनगंगा, पूर्णा आणि कयाधू ह्या तीन महत्वाच्या नद्या वाहतात.

हिंगोली कृषी प्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्याचे भोगोलिक क्षेत्र४,६२९,२४१ हेक्टर असून त्यापैकी सन २०१७-१८ मध्ये निव्वळ पिकाखालील क्षेत्र ३,८१,१६४ हेक्टर आहे. जिल्ह्यातील उडीद, मूग, सोयाबीन, तांदूळ, कापूस इ. महत्त्वाची खरीप पिके असून हरभरा, करडई, ही रब्बी पिके आहेत. केळी व हळद ही प्रमुख व्यापारी पिके जिल्ह्यात पिकवली जातात. जिल्ह्यात इतर तालूक्याच्या तूलनेत वसमत तालूक्यात सिंचनाचे क्षेत्र जास्त आहे. ह्या जिल्ह्यात ओलीताखालील क्षेत्र २०.३४ टक्के इतके आहे. तरीही हिंगोली जिल्ह्यातील मोठे क्षेत्र कोरडवाहु व डोंगराळ आहे.

हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेती करताना अनेक संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात मोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकारी किंवा बँकेकडून घेतलेले कर्ज, शेतीचा वाढणारा खर्च अशा अनेक संकटांना शेतकऱ्यांना प्रत्येक वेळी सामोरे जावे लागते. सर्व सामान्याच्या मते शेतकरी हा कर्जातच जन्मतो आणि कर्जातच मृत्यू पावतो. शेतकऱ्यांना शेतीवर कुटूंब, कपडे, मुलांचे शिक्षण, आजारपण, घरखर्च, विवाह, धार्मीक कार्य, सण अशा अनेक कार्यासाठी पैसा लागतो. तो शोतीच्या उत्पन्नातून मिळालेल्या पैशातून ह्या गरजा शेतकऱ्यांच्या पूर्ण होवू शकत नाहीत. शेतकऱ्यांना जर त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकास साध्य करायचा असेल तर केवळ शेतीवरच अवलंबून न राहता शेतीबरोबरच इतर शेतीला पूरक (जोडधंदा) व्यवसाय करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत भारतात व महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांनी शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसाय करीत आहेत. त्यामुळे शेतीपूरक व्यवसाय करत असताना त्याचा शेतकऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जिवनावरही अनेक परिणाम घडून येताना दिसुन येत आहे. अशा सामाजिक आणि आर्थिक बदल घडुन आणण्यात एकंदरीत शेतीपूरक व्यवसायाची भूमिका काय राहीली आहे हे अभ्यासासाठी मी माझ्या संशोधनाकरीता "**शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूरक व्यवसायाची भूमिकाः विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा**" ह्या व्यवसायातील मी संशोधनासाठी हिंगोली जिल्ह्यातील काही प्रमुख शेतपूरक व्यवसाय निवडले आहेत. त्यात शेळी आणि मेंढीपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कूटपालन, फूलशेती आणि फळशेती प्रस्तुत संशेधनासाठी निवडले आहेत ते पूढील प्रमाणे :

शेतीपूरक व्यवसायाची व्याख्या :

"निसर्गाच्या अवकृपेने अथवा इतर कोणत्याही कारणाने (जसे पिकावरील रोग, शेतीचा वन्य प्राण्याव्दारे विध्वंस) कोरडवाहू अथवा सिंचनाच्या अंतर्गत असणाऱ्या शेतीतील प्राप्त

उत्पन्नाची हमी नसल्यामुळे, शेतकऱ्यांना पर्यायी उत्पन्नाचा मार्ग म्हणजे शेतीपूरक व्यवसाय होय."

१. शेळी व मेंढीपालन :

शेळी व मेंढीपालन हा शेतीला पूरक व्यवसाय म्हणून केला जातो आणि या व्यवसायाला कमी भांडवल कमी जागेत आणि कुठल्याही वनस्पतीवर सहज गुजराण करुन तग धरु शकणारा हा व्यवसाय आहे म्हणुन शेळीला गरीबांची कामधेनु असे म्हणतात. अलीकडील काळात शेळी व मेंढी यांच्या मासाची मागणी वाढली असून शेळीपासून दुग्ध, कातडी, लोकर, शेळीच्या शिंगापासून व खुरापासून डिंकयुक्त पदार्थ तयार करतात. शेळीच्या लेंडीपासून उत्तम प्रकाराचा खत मिळतो शेळीच्या आतड्यापासून ऑपरेशनसाठी धागे तयार करतात. भारतामध्ये शेळ्यांच्या २३ जाती आहेत. महाराष्ट्रात उस्मानाबादी व संगमनेरी ह्या दोन जाती जास्त उत्पादन देणारे असल्यामुळे महाराष्ट्रात सर्वत्र आढळतात शेती पालनाच्या प्रकारात चराऊ शेळी पालन अंशंतः बंदिस्त शेळीपालन हे दोन प्रकार पडतात. पशुगणना अहवालानुसार शेळ्यांच्या संख्या भारतात संदर्भ वर्ष २०१२ व अहवाल वर्ष २०१८ वर्षामध्ये १३५.१७ दशलक्ष शेळ्यांची संख्या होती. त्यात महाराष्ट्रात ८४.३५ लाख शेळ्यांची संख्या होती. हिंगोली जिल्ह्याचा विचार करता १,११,२१० एवढी शेळ्यांची संख्या होती. व मेंढ्यांची ६,६०७ हजार इतकी होती. महाराष्ट्र शासन हे सुध्दा नानाजी देशमुख कृषी संजीवन योजनेच्या मार्फत शेळी व मेंढी पालन करण्यासाठी अनुदान देत आहे. शेळी पालन कर्ज योजना २०२१ शेळी व पालन शेड अनुदान योजना २०२१-२२ अशाप्रकारच्या योजना राबवल्या जात आहेत.

२. दुग्ध व्यवसाय :

पशुपालन व शेती हे एकमेकांना पूरक व्यवसाय आहेत. खरे पाहिले तर पशुपालनशिवाय शेतजमिनीची सुपिकता टिकवता येत नाही. दुग्ध हा पूर्वी पासूनच परंपरागत चालत आलेल्या महत्वाचा व्यवसाय आहे. दुग्ध व्यवसायासाठी प्रामुख्याने संकरीत गाई, देशी गाई, दुभत्या म्हैशी पाळल्या जातात. दुग्ध शेतीपूरक व्यवसाय हा कायमस्वरुपी उत्पन्न देणारा

व्यवसाय म्हणुन ओळखला जातो. आहार दृष्ट्या मानवाच्या आहारामध्ये प्रतिदिन ३०० मि.ली. दुधाराची गरज असते. वाढत्या लोकसंख्या विचारात घेता दुधाचे उत्पादनामध्येही वाढवणे फारच गरजेचे आहे.

राज्य शासनातर्फे नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत दुधाळ संकरीत गाई, म्हैशीचे गट वापट करणे यासाठी ग्रामीण भागात सर्वसाधारण प्रवर्ग गटासाठी ५० टक्के अनुदान व अनुसूचीत जाती जमासाठी ७५ टक्के अनुदान देण्यात येते. केंद्र सरकारतर्फे सुध्दा प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजन, राष्ट्रीय बुळकांडी रोगनिर्मुलन कार्यक्रम, माहिती व जनसंपर्क मेळाव्याचे आयोजन करणे, पशुरोग नियंत्रण कार्यक्रम (NADCB) व मनरेगा अंतर्गत शेडअनुदान दिले जाते. दुधामध्ये पाणी, कार्बोदके, स्निग्धांश, क्षार, जिवनसत्वे भरपूर प्रमणात आढळतात हिंगोली जिल्ह्यात एकुण १२ दुग्ध विकास सहकारी संस्था आहेत. २०१७-१८ या वर्षात शासकीय दुध योजने अंतर्गत १५,१०,००० लिटर दुध संकलीत करण्यात आले. हिंगोली जिल्ह्यात ५ पशुवैद्यकीय चिकित्सालय, १८ पशुवैद्यकीय दवाखाने, ४६ पशुवैद्यकीय प्रथमोपचार केंद्रे,६९ कृत्रिम गर्भधारण रेतन केंद्रे आहेत. जिल्ह्यातील एकुण पशुधन अहवाल २०१७-१८ च्या संदर्भ वर्ष २०१२ नुसार एकुण विदेशी संकरीत गाई व देशी गाईची एकुण संख्या २,७५,९९१ तर म्हैशींची संख्या ६,६,३२३ एवढी आहे.

३. कुक्कूट पालन (कोंबडी पालन) :

अंडी आणि मासे यांच्या उत्पादनासठी कुक्कुटपालनाचा व्यवसाय जगात सर्वत्र केला जातो. कुक्कुट पालनाचा विचार भारतात इज्जतनगर येथे सन १९३९ साली भारतीय 'पशुपक्षी' अनुसंधान 'संस्था' स्थापन करण्यात आली त्यामध्ये भारतातील या व्यवसायची प्रगती लक्षात घेता, देशात १९६१ साली ३ कोटी ३० लक्ष एवढी व २० लाख सुधारीत कोंबड्यांपासून २३४ कोटी अंड्यांचे उत्पादन मिळाले. तरीही अमेरिका व चीन यांच्याशी तुलना करता हा आकडा फारच कमी असल्याचे दिसुन येते. डेन्मार्क, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, कॅनडा, अमेरीकेची संयुक्त संस्थने इ. देशात कुक्कुटपालन ही कृषी व्यसाची एक महत्त्वाची शाखा मानण्यात येते.

अलीकडच्या काळात फार मोठ्या प्रमाणावर आधुनिक पध्दतीने कुक्कूटपालन करणाऱ्या व्यावसायीक संस्था अस्तित्वात आलेल्या असुन त्यांच्यामार्फत बऱ्याच दूरवर अंडी व मासे यांचे वितरण करण्यात येते.

कुक्कुटपालन व्यवसायासाठी शेड, पाण्याची व्यवस्था, विजेची व्यवस्था, खाद्याची व्यवस्था, भांडी, पिंजरे, जााळ्या इ. खर्च करण्यात येतो. त्याशिवाय महत्त्वाचा खाद्य व औषधावरही खर्च होतो. त्यासाठी भांडवल व दैनंदिन लागणारा खर्च यासाठी शासनाने विविध योजना राबवलेल्या दिसुन येतात. केल्यात. नाबार्ड संस्थेच्यामार्फत कुक्कुट पालन योजना आणि वेंचर फंड स्वरुपातही मदत केली जाते. स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इतर शासकीय बँकांच्या योजनेतुन कुक्कुटपालनासाठी विशेष कर्ज राबवल्या जात आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमार्फत कुक्कुटपालन योजना राबवल्या जातात. या योजनेमध्ये बॉयलर, अगलेअर जातीचे उत्पादन केले जाते. आज गावोगावी अनेक ठिकाणी छोटे-मोठे पोल्ट्री युनिटस् सुरु आहेत. कुक्कुटपालन व्यवसाय करण्यासाठी हॅचरीजमधुन त्या कोंबडीबाबत सर्व माहिती उपलब्ध होते. हिंगोली जिल्ह्यातील २०१२ च्या पशुगणनेनुसार कुक्कुट पालन या व्यवसायात १,५०,६६५ कुक्कुटपालन पक्षी आहेत. त्यातील कोंबड्याची संख्या १,३८,५१३ आहे.

४. फूलशेती :

फूलशेती करणे ही भारताची खूप जूनी परंपरा असली तरी सामाजिक सुधारणा आणि विकासाच्या दृष्टीने एक शास्त्र म्हणून फूलशेती अतिशय महत्तवाची कामगिरी बजावत आहे. आताच्या जागतिकीकरणाच्या युगात मात्र नियतिक्षम फूलोउत्पादनास महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे मागणी तसा पूरवठा या संज्ञेनुसार सद्याच्या स्पर्धात्मक युगात उच्च प्रतिचे दर्जेदार फूलोत्पादन घेणे अत्यावश्यक आहे. विविध राष्ट्रामध्ये फुलांच्या उत्पादनात सतत वाढ होत आहे. त्यामध्ये ६ ते २० टक्के प्रतिवर्ष वृध्दी वाढ होत आहे. भारत देश हा विविध परंपरेने नटलेला देश आहे. भारतामध्ये विविध सांस्कृतीक सण व समारंभामध्ये जाई, जूई, मोगरा,

अबोली, झेंडू, गुलाब,ॲस्टर शेवंती, इ. सूट्या फूलांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. मुंबई,पूणे, बेंगलोर, हैद्राबाद, दिल्ली यासारख्या मोठ्या शहरांच्या आसपास देखील फूलशेती विकसित होत आहे. शहरानजीक उच्च तंत्रज्ञानयुक्त हरितग्रह उभारण्याकडे कल आहे. देशाच्या फूलशेतीचा विचार करता आंध्रप्रदेश हे फूलोत्पादनातील अग्रेसर राज्य आहे. महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्र फूलउत्पादनात पाचवा क्रमांक लागतो. देशात फूलशेतीच सरासरी २ लाख ३३ हजार हेक्टर लागवड क्षेत्र आहे.

महाराष्ट्रातील एक मोठा वर्ग फूलशेती करतो. ग्रामीण भागात फूलशेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर खूप उलाढाल होताना दिसते. राज्यसरकारनेही फूलांच्या हरितग्रहातील व मोकळ्या जागेतील फूल उत्पादनाला प्रोत्साहन दिले आहे. हिंगोली जिल्ह्यात-वसमत, औंढानागनाथ, कळमनुरी, हिंगोली, सेनगाव आदी तालुक्यात शेतकरी प्रामुख्याने गुलाब, झेंडू, मोगरा, शेवंती, गलांडा, लिली, निशिगंध अशा फुलांचे उत्पादन घेतले जाते. शेतकऱ्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण होण्यासाठी फुलशेती करणे हे महत्त्वाचे ठरते त्यामुळे त्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासात वाढ होते.

५. फळशेती : फळशेती हा व्यवसाय देखील महाराष्ट्रामध्ये शेतीपूरक व्यवसाय म्हणून केला जात आहे. कोकणातील हवामान आणि पर्जन्यमान आंबा, नारळ काजू, सुपारी इ. फळ पिकांसाठी पोषक असते. तर महाराष्ट्रातील काही भागात लिंबु, संत्री, मोसंबी यासारखी फळांचे पिके घेतली जातात. कोरड्या हवामान पाण्याची उपलब्धता असेल तर द्राक्षासारखे उत्पादन घेण्यास फायदेशिर ठरते. फळबाग शेतीमध्ये झाडांच्या सुरुवातीच्या काळात पाणी व्यवस्थापन हा महत्त्वाचा भाग असतो. बहुवर्षीय फळझाडे मोठी झाल्यानंतर त्यांना पाण्याची फरशी गरज भासत नाही. उदा. आंबा, चिकू, नारळ, सुपारी इ. परंतु संत्रा, मोसंबी, लिंबू द्राक्षे यांना फळे धारण्याच्या हंगामात पाण्याची गरज असते. फळझाडाच्या पाण्याच्या गरजेनुसार फळबागांचे दोन प्रमुख प्रकार पडतात.

१) कोरडवाहू फळबाग शेती व २) बागायात फळबाग शेती.

हिंगोली जिल्ह्यात शेतीला पुरक व्यवसाय म्हणुन फळबाग लागवड केली जाते. ह्या जिल्ह्यात कृषी विभागातर्फे सन २०१८-१९ मध्ये भाऊसाहेब फूंडकर फळबाग लागवड योजनेसाठी १.८० कोटी रु. मंजुर झाले होते. यात आंबा, काजू, पेरु, डाळिंब, संत्रा, मोसंबी, लिंबु, नारळ, सीताफळे, आवळा चिंच, जांभूळ, फणस, अंजीर, चिकू इ. फळांचा समावेश अनुदानात केलेला दिसुन येतो. या योजनेचा लाभ प्रत्येक तालुक्यात प्राप्त होणाऱ्या आर्थिक लाभार्थ्यांचे मर्यादित योजनेच्या निकषानुसार पात्र लाभार्थ्यांची निवड केली जाते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासान नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाअंतर्गत फळबाग लागवडीला अनुदान दिले जाते. फळबाग लागवडी मध्ये अंतर पिकसुध्दा घेता येते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सुधारणा होते. फळांचे नुकसान झाल्यास प्रधानमंत्री फसल विमा योजने अंतर्गत फळपिक विमा योजना राबविले जाते.

अशा प्रकारे शेतकरी हा आपल्या पारंपारिक शेती व्यवसाया बरोबरच शेतीपूरक व्यवसायांची निवड करुन आपल्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून विकास साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही बाब लक्षात हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी शेतीपूरक व्यवसायाकडे वळले असून यामुळे त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये कशाप्रकारची सुधारणा झाली आहे हा प्रश्न उपस्थित होतो म्हणुन प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातुन याचा आढावा घेण्यात येणार आहे.

संशोधनाची विषयाची गरज :

भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे आजही ५० टक्केच्या वर लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या शेतीवर अवलंबून आहे. भारतीय शेतकरी हा बहूधा निरक्षर असून त्यांची शेती करण्याची पध्दती ही परंपरागत आहे. त्यामुळे त्यांची शेतीची उत्पादकता ही कमी आहे. यामुळे शेती किफायतशीर राहिली नाही. मान्सूनचा लहरीपणा, गरीबी, कर्जसोयींचा अभाव, नैसर्गिक आपत्ती, शेतीमालास मिळणारा कमी भाव, वाढत्या बी-बीयाणे, किटकनाशक,खते त्यांच्या वाढत्या किंमती या कारणामुळे शेतकरी पारंपारिक व आधुनिकता या दोन ध्रुवांच्या मध्ये

गोधळलेल्या स्थितीत आहे. हि परिस्थिती महाराष्ट्राबरोबरच हिंगोली जिल्ह्यात सुध्दा दिसून येते. परंतु आज काही शेतकरी शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसायाकडे वळत आहेत. ज्यामुळे शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारीत आहेत का ? वाढ होत आहे का ? शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसायाचे कसे महत्व आहे हे इतर शेतकऱ्यांच्या समोर आणुन त्यांना शेतीपूरक व्यवसायाकडे कसे वळवता येईल. याचा प्रयत्न या संशोधनाच्या माध्यमातून येथे करण्यात येणार आहे.

संशोधनाचे महत्व :

Our culture is Agriculture असे आपण म्हणतो 'मेरे देश की धरती सोना उगले-उगले हीरे मोती' अशी महती शेतीची शेतीची गातो, शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पण मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्याचा विचार केला असता जिल्ह्यातील शेती हि जास्त प्रमाणात मोसमी पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे "शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूरक व्यवसायाचे भुमिकाः विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा" हा विषय निवडला. महाराष्ट्र शासन सुध्दा शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून अनेक योजना राबवत आहेत. त्यामध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना राबवली जाते. त्याचबरोबर पशुंसाठी गोठा दिला जातो, पशुपालन कर्ज योजना राबवल्या जातात, शेतकऱ्यांना पशूना गोठा बांधण्यासाठी अनुदान दिले जाते, पशुपालन कर्ज दिले जाते त्यामुळे शेतकऱ्यांना रोजगार मिळेल व त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात भर पडावी हा त्यामागे शासनाचा उद्देश आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपूरक व्यवसायामुळे सामाजिक, आर्थिक विकासात कशाप्रकारे बदल होत आहेत त्यामुळे या संशोधनाचा उपयोग महाराष्ट्र शासन, जिल्हा प्रशासन, विविध संशोधक मंडळे, शेतकरी आणि शेतपूरक व्यवसाय योजना राबवण्यासाठी हे संशोधन कार्य उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे या संशोधन विषयाला विशेष महत्व आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

कोणतेही संशोधन कार्य करीत असताना संशोधक काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेऊन संशोधन कार्य करीत असतो. संशोधनाला योग्य दिशा मिळावी, संशोधन हे हेतुपूर्ती करणारे असावे असे अपेक्षित असते. यासाठी प्रस्तुत संशोधकाने सदरील संशोधनाची खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१. शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीत शेतीपूरक व्यवसायांचे महत्व अभ्यासणे.
२. हिंगोली जिल्ह्यातील शेतीपूरक व्यवसायाचा आढावा घेणे.
३. शेती पूरक व्यवसायातील समस्यांचा अभ्यास करणे.
४. कृषीपूरक व्यवसाय वृध्दीसाठी शासकीय योजनांचे योगदान अभ्यासणे.
५. शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक विकासातील शेतीपूरक व्यवसायांची भूमिका विचारात घेणे.
६. हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी शेतीपूरक व्यवसाया संदर्भात शिफारशी सूचवणे.

संशोधनाचे गृहितकृत्येः

कोणतेही संशोधनकार्य करताना गृहीतकांची मांडणी करावी लागते. त्याशिवाय संशोधन करता येत नाही. वस्तुस्थितीला विचारलेला प्रश्न म्हणजे गृहीतके होय. म्हणून गृहीतकृत्यांचे सामाजिक संशोधनातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. गृहीतके ही संशोधनास नेहमी पुढे नेतात. याच अनुषंगाने प्रस्तुत संशोधन विषयाची काही गृहीतके पुढीलप्रमाणे मांडली आहेत.

१. हिंगोली जिल्ह्यात शेतीपूरक व्यवसायाचे प्रमाण कमी आहे.
२. हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती खालावलेली आहे.
३. शेतीपूरक व्यवसाय करतांना शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.

४. गरजू शेतकऱ्यांपर्यंत शेतीपूरक व्यवसायाचे लाभ पोहोचवण्यात सरकारला अपयश आले आहे.

५. शेती पूरक व्यवसायामुळे हिंगोली जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत सुधारणा शक्य होतात.

संशोधन आराखडा :

संशोधक त्याच्या संशोधनाचे किंवा कामाचे नियोजन, रुपरेषा, संशोधन मांडणीचे स्वरुप निश्चित करीत असतो यास आपण संशोधन आराखडा असे म्हणतो. "शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूरक व्यवसायाची भुमिका: विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा" या विषयाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग संशोधन करण्यासाठी करण्यात येईल.

तथ्य संकलनाच्या पद्धती :

तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम सामुग्रीचा वापर करण्यात येणार आहे. ते खालीलप्रमाणे.

अ) प्राथमिक माहिती स्त्रोत :

प्राथमिक माहितीत शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूरक व्यवसायाचे भूमीका अभ्यासण्यासाठी प्रामुख्याने प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी तालुका निहाय यादृच्छिक पद्धतीने गावांची निवड तेथील शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येईल व त्याचप्रमारे अनुसूची, प्रश्नावली, निरीक्षण ह्या साधनांचा वापर माहिती संकलीत करण्यासाठी करण्यात येणार आहे.

ब) दुय्यम माहिती स्त्रोत :

संशोधन कार्यासाठी अथवा एखाद्या घटकाविषयी माहिती घेण्यासाठी स्वतः अवलोकन करुन किंवा स्वतः अनुभव न घेता पूर्वी कोणीतरी संकलीत केलेली तथ्ये घेऊन जेंव्हा संशोधन कार्य केले जाते. अथवा एखाद्या घटकाचा अभ्यास केला जातो. तेंव्हा त्यास दुय्यम तथ्ये असे

म्हणतात. दुय्यम माहितीच्या साधनांमध्ये संशोधन अहवाल व शोधनिबंधक , भारतीय कृषी विभागाने प्रसिद्ध केलेले अहवाल, वार्षिक अहवाल, पशुगणना अहवाल, पंचवार्षिक योजनांचा अहवाल, केंद्र सरकार व राज्यसरकारची अंदाजपत्रके, जिल्हानिहाय अहवाल, मासिके, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, इंटरनेट याप्रमाणे "शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूरक व्यवसायाचे भूमिकाः विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा" या विषयाचा अभ्यास करण्यासाठी या साधनांचा पूरेपूर वापर करण्यात येईल.

नमूना निवड :

प्रस्तुत संशोधनामध्ये "शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूरक व्यवसायाची भूमिकाः विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा" या विषयाचा अभ्यास करीत असतांना सहेतुक पध्दतीने महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्याचीच या सर्व्हेक्षणासाठी (संशोधनासाठी) निवड करण्यात आली आहे. हिंगोली जिल्ह्यात एकूण ६७५ गावे आहेत व पाच तालूक्यापैकी सर्व तालूक्यांची निवड करण्यात येणार आहे. आणि या प्रत्येक तालुक्यातील १५ गावांची निवड करुन प्रत्येक गावातुन ०५ या प्रमाण नमुन्याची नमुना पध्दतीने निवड करण्यात येईल. म्हणजेच प्रत्येक तालुक्यातुन ७५ नमुना निवड या प्रमाणे हिंगोली जिल्ह्यातील एकुण ३७५ नमुन्यांची निवड करण्यात येईल.

संशोधन अभ्यासाचा कालावधी :

"शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूरक व्यवसायाची भूमिकाः विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा" या विषयाचा अभ्यास करण्यासाठी सन २००८-०९ ते २०१८-२०१९ या अकरा वर्षाचा कालावधीची निवड करण्यात आली आहे. या कालावधीत हिंगोली जिल्ह्यातील किती शेतकरी शेतीपूरक व्यवसायाकडे वळले आहेत. या व्यवसायामुळे त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात प्रगती झाली आहे का ? हा शोध या संशोधनाच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा :

प्रस्तूत संशोधनामध्ये "शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात शेतीपूरक व्यवसायाचे भूमिका" या अभ्यास करताना विशेष संदर्भ हिंगोली जिल्ह्याचा अभ्यास करण्यात येणार आहे. सदर संशोधनाव्दारे काढण्यात येणारे निष्कर्ष केवळ हिंगोली जिल्ह्यापूरतेच मर्यादित आहे. यामुळे याचे निष्कर्ष इतर जिल्ह्यांना लागू होईलच असे म्हणता येणार नाही म्हणून ही या संशोधनाची मर्यादा आहे.

आकडेवारीचे तंत्र :

आकडेवारीचे तंत्रामध्ये विश्लेषण करण्यासाठी आवश्यकतेनूसार सांख्यकिय साधनांचा वापर करण्यात येणार असून त्यात सरासरी, वृध्दिदर, सहसंबंध,F-टेस्ट, Z-टेस्ट,T-टेस्ट,प्रमाप विचलन अशा सांख्यकिय साधनांचा वापर आवश्यकते करण्यात येणार आहे.

प्रकरणांची रचना :

प्रस्तुत शोध प्रबंध खालील सहा प्रकरणात विभागला आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना :

भारतीय शेतीची स्थिती, हवामान व भारतातील शेतीची स्थिती, महाराष्ट्रातील शेतीची स्थित,हिंगोली जिल्ह्यातील शेतीची स्थिती व हिंगोली जिल्ह्यातील शेती पूरक व्यवसायासाठी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुविधा, योजना या अभ्यासाबरोबरच संशोधनाची गरज, संशोधनाचे महत्व, उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, संशोधन पध्दती यांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : संशोधक साहित्याचा आढावा :

या प्रकरणामध्ये या विषयासंदर्भात झालेल्या संशोधनाचा, विविध लेखकांनी लिहिलेल्या तसेच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, स्थानिक स्तरावर संशोधनावर लेखांचा, माहितीचा, संक्षिप्त आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे : हिंगोली जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक स्थिती :

या शोध प्रबंधामध्ये तिसरे प्रकरण हे हिंगोली जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक स्थिती घेण्यात आले असून या प्रकरणात भौगोलिक आणि प्रशासकीय दृष्टीकोणातून हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यास करण्यात येणार आहे. यात जिल्ह्याचा समग्र आढावा, स्थान व व्याप्ती, भौगोलिक संरचना, लोकसंख्या, हवामान, नद्या, मृदा, कृषी, पशुसंवर्धन, वन व वनसंपदा, आर्थिक गणना, सिंचन

प्रकरण चौथे : हिंगोली जिल्ह्यातील कृषीपूरक व्यवसायाचे स्वरुप व अडचणी :

प्रस्तूत प्रकरणामध्ये शेतीपूरक व्यवसायांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार असून या अंतर्गत १. शेळीपालन २. दुग्धव्यवसाय ३. कुक्कुटपालन ४. फूलशेती ५. फळशेती इ. शेती पूरक व्यवसाय करताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : सामाजिक व आर्थिक विकासात शेती पूरक व्यवसायाची भूमिका :

प्रस्तुत प्रकरणामध्ये हिंगोली जिल्ह्यातील शेती पूरक व्यवसाय करणाऱ्या ज्या शेतकऱ्यांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात येईल, प्रत्यक्ष मुलाखते घेऊन व त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात बदलांचे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण सहावे : निष्कर्ष आणि शिफारशी :

प्रस्तूत प्रकरणामध्ये संपूर्ण संशोधन अहवालाचा निरिक्षणात्मक व चिकित्सक अभ्यास करुन निष्कर्ष काढण्यात येईल व त्याच बरोबर या निष्कर्षावरुन योग्य त्या शिफारशी केल्या जातील.

वर्ष निहाय नियोजन आराखडा :

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी व अध्ययन याच बरोबर प्रबंध लेखनाचे कार्य यासाठी विषय निहाय नियोजन आराखडा खालीलप्रमाणे राहील.

१) प्रथम वर्ष :

विषयाच्या अनुषंगाने अध्ययन सामुग्रीचे संकलन व प्रथम प्रकरणाची रुपरेषा व मांडणी करणे याच बरोबर तथ्य संकलन करुन साहित्याचा आढावा तयार करण्यात येणार आहे.

२) द्वितीय वर्ष :

द्वितीय वर्षामध्ये संकलीत करण्यात आलेल्या तथ्यांचे अध्ययन करुन त्याचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

३) तृतीय वर्ष :

तृतीय वर्षामध्ये गृहीतकृत्याची पडताळणी निष्कर्ष आणि शिफारशी मांडण्यात येणार आहे. याच बरोबर संपुर्ण प्रकरणाची बांधणी करुन प्रबंध विद्यापीठास सादर करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथसूची :

१. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्र, 'भारतातील कृषी अर्थशास्त्र',-२०१८-१९.

२. मिश्र जयप्रकाश,(२००५) 'कृषी अर्थशास्त्र' साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा.

३. सिंह रमेश (२०१८ दहावी आवृत्ती), 'भारतीय अर्थव्यवस्था', प्रकाशन M.C. Graw Hill Education (India) Pvt.Ltd., चेन्नई.

४. कुलकर्णी न.कृ., 'शेळी पालन कसे करावे' राजेश प्रकाशन, एम.आय.टी.रोड, पुणे.

५. चोरगे तानाजीराव, (२०१४ व्दितीय आवृत्ती), 'शेतीपूरक उद्योग' राजीव दत्तात्रय बर्वे मॅनेजिंग डायरेक्टर दिलीपराज प्रकाशन, प्रा.लि. शनिवार पेठ, पुणे.

६. बुरकुले सो.स. 'आदर्श पोल्ट्री व्यवसाय', रोहन प्रकाशन शनिवार पेठ पुणे.

७. बोधनकर सुधिर, प्रा. आलोणी विवेक ॲन्ड मृणाल कुलकर्णी, (२००६-जानेवारी) 'सामाजिक संशोधन पध्दती', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

८. आगलावे,प्रदीप (२०१०) संशोधन पध्दती व तंत्रे; श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

९. देशपांडे श्रीधर, देशपांडे विनायक (२००४ प्रथम आवृत्ती), 'भारतीय अर्थव्यवस्था', हिमायल पब्लिकेशन्स हाऊस, मुंबई.

१०. मार्कंडेय नितीन,(२०१९ प्रथम आवृत्ती),'दूध व्यवसायिकांच्या यशकथा' प्रकाशन सकाळ मीडिया प्रा.लि.

११. हाडोळे मनोज,(२०१८ प्रथम आवृत्ती), 'कृषी पर्यटन एक शेती पूरक व्यवसाय', सकाळ मिडिया प्रा.लि.बुधवार पेठ, पुणे.

१२. वावरे अनिकलकुमार, कुंभार विजय (प्रथम आवृत्ती-जुन -२०१५) अर्थशास्त्रातील संशोधन पद्धती एज्युकेशनल पब्लिशर्स.

१३. **अहवाल :** जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-२०१८ जिल्हा हिंगोली जिल्हा

१४. सांख्यिकी कार्यालय, हिंगोली.

१५. केंद्रिय सांख्यिकी संघटना(CSO)-२०१७.

१६. **मासिक :** बळीराजा, ॲग्रोवन, शेतकरी मासिक

१७. **वृत्तपत्रे :** लोकमत, सकाळ, लोकसत्ता, ॲग्रोवन

Website :

https://mr.m.wikipedia.org

Vikaspedia.in.agriculture

संशोधक

राम भोजू कदम
एम.ए, (अर्थशास्त्र), बी.एड्.
मु.पो.मरळक (बु.) ता.जि.नांदेड.

मार्गदर्शक

डॉ. पी. आर. मुट्टे
सहयोगी प्राध्यापक,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आणि संशोधन केंद्र,
यशवंत महाविद्यालय, नांदेड